जा.क्र.शिक्षण/प्राथ-८/९२८८/२०२५
नासिक दिनांक २०/१० /२०२५

प्रति,

**अध्यक्ष / सचिव**
**किशोर सुर्यवंशी इंटरनॅशनल स्कुल मानोरी, ता.दिंडोरी जि.नासिक**

**विषय:-** महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरु करण्यासाठी सन २०२४-२५ या **शैक्षणिक वर्षापासुन शाळेला प्रथम मान्यता देणेबाबत.**

**संदर्भ:-** १) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२
२) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन इरादापत्र क्रमांक एसएफएस-१०२२/प्र.क्र.८५८ /एसएम-२ दि.११ नोव्हेंबर, २०२२
३) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक एसएफएस-१०२२/प्र.क्र.८५८/ एसएम-२ दि.२१ फेब्रुवारी, २०२४
४) गटशिक्षणाधिकारी, पं.स.दिंडोरी जि.नाशिक यांचेकडील पत्र क्र.शिक्षण/वि.अ-१/५२/२०२५ दि. ०६/१०/२०२५

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविणेत येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे करिता/ विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता, आपण सादर केलेल्या प्रस्तावास महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत संदर्भ क्र.२ व ३ चे शासन निर्णयान्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून **किशोर सुर्यवंशी मेमोरियल ट्रस्ट, मानोरी, ता.दिंडोरी जि.नासिक** संचलित **किशोर सुर्यवंशी इंटरनॅशनल स्कुल मानोरी, ता.दिंडोरी जि.नासिक** ही नवीन शाळा स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर सुरु करण्यासाठी, अटी व शर्तीच्या अधीन राहूनशाळा सुरु करण्यास परवागनी देण्यात आली आहे.

गटशिक्षणाधिकारी, पं.स.दिंडोरी यांचा यांनी संदर्भ क्र.०४ अन्वये अहवाल सादर केला आहे. तथापि, संस्थेने/ शाळेने सादर केलेल्या प्रस्तावानुसार आदेशात नमूद शाळेस खालील अटी शर्तीची पुर्तता करणेचे अटीवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| शासन मंजुर क्रमांक | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नांव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नांव पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नासिक | अध्यक्ष / सचिव, किशोर सुर्यवंशी मेमोरियल ट्रस्ट, मानोरी, ता.दिंडोरी जि.नासिक | किशोर सुर्यवंशी इंटरनॅशनल स्कुल मानोरी, ता.दिंडोरी जि.नासिक | इंग्रजी | सीबीएसई | इ.१ ली ते ८ वी | २०२४-२५ |

**अटी व शर्ती-**

१) संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादीमध्ये भविष्यात बदल करता येणार नाही.
२) शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
३) या अधिनियमातील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासुन असेल.
४) शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ मध्ये ज्यावर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गाव्यतिरिकत इतर वर्ग चालु करता येणार नाहीत.
५) परवानगी मिळाल्या पासुन अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी आपोआप रद्द ठरेल.
६) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमीत होणा-या आदेशाचे कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम २०१२ मधील सर्व तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहिल.
७) शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहितीकरीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीनशाळा/ वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
८) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
९) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा/ वर्ग म्हणुन स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील
१०) शासनाने सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे संस्थेला बंधनकारक राहिल.
११) महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ च्या पोटनियम(४)११ मानके पुर्ण करणे आवश्यक आहे.
१२) शासन निर्णय दिनांक १३ डिसेंबर, २०१३ नुसार संच निश्चीती करुन घेणे आवश्यक आहे.
१३) प्रचलित नियम व निकषानुसार शिक्षक नियुक्ती करावी/ टिईटी पात्र शिक्षकांची नियुक्तीसाठी योग्य ती कार्यवाही करावी.
**१४) संस्था व्यवस्थापन व शिक्षणाधिकारी (प्राथ) जि.प.नासिक यांचे संयुक्त नावे राष्ट्रीयकृत बॅंकेत तीन वर्ष कालावधीसाठी संदर्भात नमुद . शासन निर्णयाचे अनुषंगांने मुदतठेव ठेवणे आवश्यक आहे.**
**१५) शासन परिपत्रक दिनांक २४ सप्टेंबर, २०२४ मधील जोडपत्र "अ" (तपासणी सूची) नुसार पुर्तता/ कार्यवाही करणे बंधनकारक राहील.**

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद नासिक**

**प्रत:-** मा.कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासन यांना माहितीसाठी सविनय सादर..
मा.शिक्षण उपसंचालक नासिक विभाग नासिक यांना माहितीसाठी सविनय सादर.

Scanned with OKEN Scanner